**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सर्व्हे नं. ५३, ६१, १००, १०१, १०२, १०४,१२४, मुक्काम पोस्ट - सोमेश्वरनगर, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ५,५००.० टन पासून ८,०००.० टन प्रतिदिन पर्यंत, सहवीज क्षमता विस्तार १८.० मेगावॅटपासून ३६.० मेगावॅटपर्यत आणि मळीवर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलो लिटर प्रतिदिन पासून ९०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यंत क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सर्व्हे नं. ५३, ६१, १००, १०१, १०२, १०४,१२४, मुक्काम पोस्ट - सोमेश्वरनगर, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ५,५००.० टन पासून ८,०००.० टन प्रतिदिन पर्यंत, सहवीज क्षमता विस्तार १८.० मेगावॅटपासून ३६.० मेगावॅटपर्यत आणि मळीवर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलो लिटर प्रतिदिन पासून ९०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यंत क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ९-०३-२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

बैठकीच्या सुरवातीस श्री प्रताप जगताप, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविड-१९ च्या परिस्थीतीमध्ये ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी पारित केलेल्या कोविड-१९ च्या निर्देशांनुसार आयोजित करण्यात आली आहे.

श्री प्रताप जगताप, उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री हिम्मत खराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे म.प्र.नि. मंडळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्यातर्फे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास दिनांक ०९-०८-२०२१ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांनी Terms of Reference (ToR) मंजूर करण्यात आला. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांने प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सर्व्हे नं. ५३, ६१, १००, १०१, १०२, १०४,१२४, मुक्काम पोस्ट - सोमेश्वरनगर, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ५,५००.० टन पासून ८,०००.० टन प्रतिदिन पर्यंत, सहवीज क्षमता विस्तार १८.० मेगावॅटपासून ३६.० मेगावॅटपर्यत आणि मळीवर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलो

लिटर प्रतिदिन पासून ९०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यंत क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज म.प्र.नि.मंडळास प्राप्त झाला.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक २०-०१-२०२२ च्या पत्रानुसार जनसुनावणीसाठी दिनांक ९-३-२०२२ ही तारीख निश्चित करण्यात आली. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- ११ /२०२२, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०२२५-एफटीएस-००६१, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आलीः-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, पुणे<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>मुंबई यांचे प्रतिनिधी -<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | - सदस्य |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - आयोजक |

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर सदर प्रकल्पाची जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आज बुधवार दिनांक ०९-०३-२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता असल्याची जाहिर सूचना दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ च्या स्थानिक मराठी वृत्तपत्र लोकसत्ता व इंग्रजीत राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप जनतेस, पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्था यांना करण्यात आलेले होते.

तसेच या प्रकल्पाचे दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे, जिल्हा परिषद कार्यालय, पुणे, प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-१, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३, मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२, झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तलमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ४४०

००१,पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी बारामती,ता.बारामती, जि.पुणे, उपविभागीय अधिकारी, बारामती, ता.-बारामती, जि.पुणे, तहसिलदार,तहसिल कार्यालय, बारामती, ता.-बारामती, जि.पुणे, मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती, ता.-बारामती, जि.पुणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बारामती, ता.-बारामती, जि.पुणे. ग्रामपंचायत कार्यालय-करंजे, करंजेपुल, वाघळवाडी, वाणेवाडी, सोरटेवाडी, ता.बारामती, जि.पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेत स्थळ येथे उपलब्ध आहेत असे कळविण्यात आलेले होते. तसेच जनसुनावणीस ऑनलाईन उपस्थित राहण्याकरिता खालील लिंक द्वारे पर्याय उपलब्ध करून देण्यात आली.

https://us02web.zoom.us/j/89023399145?pwd=UERkR1lFL2lZQ1R0YzAva3JzYkZBUT09

आयोजक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी सूचना द्यावयाच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे देण्यात याव्यात. त्या अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करता येतील. ज्यांना तोंडी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी सादरीकरणानंतर आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार त्या प्रश्नांची उत्तरे देतील. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन ते म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याची सूचना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू प्रकल्प हा संवर्ग B१ ५ (j), ५ (g) १(d) मध्ये मोडत असून त्यास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन राज्य प्रभाव आकलन प्राधिकरणाची पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करणे बंधनकारक आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे ७४ व्यक्तींना प्रत्यक्ष तर ३०-३५ व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार आहे. प्रकल्पात सुमारे १,५०० झाडे लावण्यात आलेली

असून विस्तारीकरणात झाडे लावण्याचे नियोजन आहे. पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रु. ६३२५.० लक्ष आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी आवर्ती खर्च रु.३९३.५० लक्ष एवढा प्रती वर्षी आहे. त्याचप्रमाणे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी (CER) साठी तरतुद रु. २००.१८ लक्ष करण्यात आलेली आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगण्याची सूचना करण्यात आली.

<u>खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उत्तरेः-</u>

१. <u>श्री. धनराज बाळासाहेब जगताप, राहणार-सोमेश्वरनगर वाणेवाडी, तालुका-बारामती,जिल्हा-पुणे, उपाध्यक्ष, मानव अधिकार फाऊन्डेशन मिडीया, महाराष्ट्रः-</u>

**श्री. धनराज जगताप** यांनी उपस्थितांना प्रश्न विचारला की सादरीकरणात पोटेवस्तीचा उल्लेख आलेला असून ती कोठे आहे, ती १० कि.मी.परिघात आहे का व महसूल दफ्तरी, ग्रामपंचायत कार्यालयात त्याची शासकीय नोंद आहे का? त्यांनी पोटेवस्तीचे नकाशावर स्थान (location) दाखविण्याची सूचना केली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर देताना माहिती दिली की सर्वेक्षण स्थाने ही १० कि.मी. परिघातीलच असतात. पोटेवस्ती ही १० कि.मी. परिघाच्या आत आहे. त्यांनी नकाशावर पोटेवस्तीचे स्थान दाखवून कारखान्याच्या पूर्वेस पोटे वस्ती आहे अशी माहिती दिली.

**श्री. धनराज जगताप** यांनी उपस्थितांना प्रश्न केला की येथील कोणी पोटेवस्तीचे रहिवाशी आहेत का? त्यांनी ग्रामपंचायतीत नोंद आहे का नाही अशी विचारणा केली.

**आयोजक** यांनी कारखाना प्रतिनिधींना पोटेवस्ती कोठे आहे याची माहिती देण्याची सूचना केली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की नमुने गोळा करताना स्थानिक वस्ती, वाडी, पाडा, तांडा, छोटा कसबा येथे तेथील लोकांना नांव विचारण्यात येते. तशाच प्रकारे हे छोटे वस्तीचे ठिकाण आहे. येथे नमुने गोळा करताना स्थानिकांनी पोटे वस्ती हे नांव सांगितले.

**श्री धनराज जगताप** यांनी आक्षेप नोंदविला की कारखान्याच्या स्थानापासून मळशे गाव, वाणेवाडी गाव, मुरुम जवळ आहेत. तेथील नमुने का घेण्यात आलेली नाही? त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हवा,जल,ध्वनी यांचे नमुने त्यांच्या उपलब्धने नुसार व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार गोळा करण्यात येतात.

**त्यावेळी आयोजक** यांनी **प्रकल्प सल्लागार** यांना पोटेवस्तीचे अक्षांश व रेखांश सांगण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अहवालात त्याची नोंद घेण्यात आलेली असून ती माहिती कळविण्यात येईल. त्यावेळी अध्यक्ष यांनी तात्काळ संबंधित व्यक्तीस ती माहिती उपलब्ध करुन देण्याची सूचना केली.

**श्री धनराज जगताप** यांनी पुढे आक्षेप नोंदविला की सोमेश्वर साखर कारखान्यात गाळप चालू आहे. प्रकल्पात जो भूसा गोळा केला जातो. तो हवेत पसरुन सर्वसामान्यांच्या डोळ्यात जातो. त्याबाबत कारखाना प्रशासन कुठल्याही प्रकारची प्रतिबंधक उपाययोजना व त्यावर पाणी मारणे ही उपाय योजना करत नाही. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढू शकते.

**प्रकल्प पर्यावरण** सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात हवेचे नमुने गोळा करण्यात आलेले आहेत. ते नमुने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार (guidelines) नमुने गोळा करण्यात आलेले आहेत. येथील हवेतील घटकांचे प्रमाण राष्ट्रीय गुणवत्तेच्या आतच आढळले. त्यावेळी **श्री धनराज जगताप** यांनी सांगितले की वाणेवाडीचा कॅनॉलचा पूलापासून करंजेकडे जाताना तेथे लोकांना खूपच त्रास होतो. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की सोमेश्वरनगर येथील शाळेत कारखान्याने झाडांची लागवड केलेली होती. आता तेथे एकही झाड कारखाना प्रशासनाने ठेवलेले नाही. जर कारखाना प्रशासन शाळेतील झाडांची निगा राखत नसेल, तर वृक्षारोपण करुन संगोपन कसे करतील? आयोजक यांनी येथे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण अनुमती प्रदान करताना त्यात झाडे लावणे, संगोपन करणे या अटी बंधनकारक असतात. ते केले नाही तर दंडनीय (punishable) आहे. आयोजक यांनी सांगितले की आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. श्री धनराज जगताप यांनी सूचना केली की कारखान्याने वृक्षारोपण करुन त्यांची निगा राखण्यात यावी यांची नोंद घेण्यात यावी.

यावेळी अध्यक्ष यांनी सूचना केली की विस्तारिकरण प्रकल्पाच्या अनुषंगाने कारखान्याने वृक्षारोपण करुन त्यांची निगा राखावी अशी कारखाना प्रशासनास सूचना करण्यात येत असून याची नोंद जनसुनावणीच्या इतिवृतात घेण्यात यावी.

१ **<u>श्री सचिन हनुमंत गाडेकर, राहणार-चोपडस,तालुका-बारामती, जिल्हा-पुणेः-</u>**
कारखाना प्रशासनाने जे विस्तारिकरण नियोजित केलेले आहे, त्यामुळे परिसरातील शेतीला, पीकांना काही नुकसान होईल काय याबाबत माहिती देण्यात यावी.
पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की हवा प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वे (guidelines) प्रकल्प प्रवर्तक कार्यरत प्रकल्पात तंतोतंत पालन करत आहे व भविष्यात विस्तारिकरण प्रकल्पातही पालन केले जाईल. तेच धोरण जल प्रदूषणाबाबत अंगिकारण्यात आलेले आहे. त्यामुळे परिसरातील शेती व पीकांवर कुठलाही दुष्परिणाम होणार नाही.

**श्री सचिन गाडेकर** यांना प्रकल्प विस्तारिकरणास पूर्णपणे पाठिंबा व्यक्त केला.

२ <u>श्री राहूल उत्तमराव जगताप, राहणार-वाणेवाडी,तालुका-बारामती,जिल्हा-पुणेः-</u>

**श्री राहूल जगताप** यांनी प्रश्न विचारले की सादरीकरणात २८ कि.मी. अंतरावर अभयारण्य असल्याचे दर्शिविले आहे. तर यात फक्त अभयारण्य येते वा इतरही वने येतात.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की अभयारण्य आणि केंद्र व राज्य शासनाने अधिसुचित केलेली राखीव वने यांचा अंतर्भाव होतो. सामाजिक वनीकरणचा यात समावेश नसतो. त्यावेळी श्री. राहूल जगताप यांनी अधिकृत्त वनजमिनींचा समावेश असतो का याबाबत विचारणा केली असता अधिसूचनेनुसार अधिकृत्त वनजमिनींचा समावेश नसल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी **श्री राहूल जगताप** यांनी आक्षेप नोंदविण्याची सूचना केली की प्रकल्प ज्या वाघाळवाडी ग्रामपंचायतीत कार्यरत आहे, त्या १० कि.मी. परिघात ग्रामपंचायतीचे अधिकृत वनक्षेत्र असून तेथे वन्यप्राणी चितळ , हरिणे, ससे इ. प्राण्याचा वावर आढळतो.तेथे इतरही वन्यप्रजातीही आहेत.

यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) अहवालात श्री राहुल जगताप यांनी सांगितलेल्या सर्व वन्य प्रजातींचा १०कि.मी. परिसरात आढळल्याचा उल्लेख आहे. प्रकल्पातील सर्व औद्योगिक प्रक्रिया या प्रकल्पातच कार्यान्वित राहतील. प्रकल्पाबाहेर फक्त कच्चा व पक्का माल याबाबतची वाहतुक असलेल व याबाबतचा संभाव्य आघात मुल्यांकन मध्ये अंतर्भाव केलेला आहे. त्याचप्रमाणे कारखान्याने घ्यावयाची खबरदारीचा उल्लेख अहवालात नमुद केलेला आहे. प्रत्यक्ष आघात व अप्रत्यक्ष आघात व त्यावर उपाययोजना याबाबतची माहिती अहवालात दिलेली आहे. उदा- ज्या भागात वन्यप्राण्यांचा अधिवास आहे, तेथील वाहतुक ही रात्री थांबवावी. श्री राहूल जगताप यांनी याबाबत अंमलबजावणीवर कोण लक्ष ठेवणार याबाबत प्रश्न विचारला. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी संबंधित शासकीय विभाग याबाबत अंमलबजावणीवर लक्ष ठेवत असते.

**आयोजक** यांनी माहिती दिली की जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा समावेश अंतिम ईआयमध्ये करण्यात येतो. पर्यावरणाची तज्ज्ञ समिती ते अवलोकन करून जर प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेत सुधारणा करायची असल्यास त्याबाबत आदेश देण्यात येतात. त्या सर्व अटी व शर्तींची समावेश पर्यावरण अनुमती (Environment Clearance) मध्ये करण्यात येतो, नंतर म.प्र.नि. मंडळाकडून प्रकल्प उभा करण्याकरीता संमतीपत्र (Consent to Establish) देण्यात येते. अर्जामध्ये सर्व माहिती प्रकल्प प्रवर्तकांना द्यावी लागते. प्रकल्पात निर्माण होणा-या सर्व प्रदुषीत घटकांची माहिती व त्यावर प्रक्रिया करण्याकरिता बसवण्यात आलेली यंत्रणा याची संपूर्ण पाहणी केल्यानंतरच म.प्र.नि. मंडळाकडून प्रकल्प कार्यान्वित करीता संमतीपत्र (Consent to Operate) प्रदान करण्यात येते.

**श्री राहूल जगताप** यांनी पुढे प्रश्न विचारला की प्रकल्पात १८ मेगावॅटचा सहवीज प्रकल्प कार्यान्वित असून १०० टनाचा बॉयलर असून विस्तारिकरनात नवीन किती क्षमतेचा बॉयलर असणार आहे. यास उत्तर देण्यात आले की १०० टनाची नवीन बॉयलर घेणार असून त्यास चिमणी

व इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर ही अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे जेणेकरून वातावरणातील हवेच्या गुणवत्तेवर कुठलाही विपरित परिणाम होणार नाही. यावेळी **श्री राहूल जगताप** यांनी बगॅसच्या प्रदुषणाबाबत विचारणा केली असता ,पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की बगॅस हाताळणी व राख हाताळणी ह्या दोन्ही बंद close system मध्ये करावे अशा सूचना आम्ही प्रकल्प प्रवर्तकांना केलेल्या आहेत. त्यावेळी श्री जगताप यांनी आपण सांगता यावर विश्वास ठेवण्यात येईल, मात्र कारखान्याने अंमलबजावणी केली नाही तर त्यावर पुढील काय कारवाई होईल?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले सदरहू अहवाल हा राज्य शासनाच्या तज्ज्ञ समितीसमोर जातो. या समितीतर्फे अहवालाचे निरीक्षण करण्यात येते व त्यानंतरच पर्यावरण अनुमती प्रदान करण्यात येते. दर सहा महिन्यांनी प्रकल्प प्रवर्तकास पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीच्या पालनाबाबत अहवाल सादर करावयाचा असतो. पर्यावरण सल्लागार यांनी ही जनसुनावणी प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणासाठी असून त्याबाबत शंका, सूचना, आक्षेप उपस्थित करण्याची सूचना केली. त्यावेळी श्री जगताप यांनी आताच्या वस्तूस्थितीबाबतच, समोर जे दिसते त्याबाबत बोलणार का भविष्याबद्दल बोलणार असा आक्षेप नोंदविला. जर त्यावेळी नियम असणारच, त्या नियमांची अंमलबजावणी झाली नाही, तर आता कशी होईल हा प्रश्न विचारला. पर्यावरण सल्लागार यांच्यातर्फे सांगण्यात आले की कारखान्याच्या वतीने आपणास आश्वासन देण्यात येते की स्थानिकांना येणा-या अडचणींतून मार्ग काढण्यात येईल. श्री जगताप यांनी या मुद्द्यांवर विरोध दर्शिविला व त्याची नोंद घेण्याची विनंती केली.

**अध्यक्ष,** यांनी माहिती दिली की येथे जे मुद्दे उपस्थित करण्यात आले, त्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येत आहे. राज्य शासन स्तरावर जी पर्यावरण समिती आहे, त्यांच्यासमोर हे मुद्दे उपस्थित करण्यात येतील व समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल.

**श्री राहूल जगताप** यांनी आक्षेप नोंदविला की संरक्षित वनक्षेत्र (Protected Forest Area) या ग्रामपंचायतीच्या १० कि.मी. परिघात आहे, याचीही नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना जे सर्वेक्षण करण्यात आले, त्यावेळी नमुने कशाप्रकारे गोळा करण्यात आले.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की सदरहू सर्वेक्षणादरम्यान पाणी, हवा याचे नमुने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसारच (guidelines) करण्यात आलेले आहेत. सदरहू सर्व माहिती पर्यावरण मुल्यांकन अहवालात नमुद केलेली असून त्याची प्रत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.

**आयोजक** यांनी सांगितले की सदरहू अहवाल हा तीस दिवस अगोदर ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थांसाठी उपलब्ध करण्यात आलेला आहे असे सांगितले.

३ <u>श्री राजेंद्र तुकाराम जगताप, राहणार-वाणेवाडी, तालुका-बारामती, जिल्हा-पुणेः-</u>

**श्री राजेंद्र जगताप** यांनी सांगितले की साखर प्रकल्प विस्तारिकरणाबाबत फारशी शंका नाही. मात्र आपण जे आसवणी प्रकल्पाचे जे विस्तारिकरण करत आहात, त्यामुळे कशा स्वरुपाचे प्रदूषण होईल त्याचा परिसरातील समाज जीवनावर काय दुष्परिणाम होईल याबाबत शंका आहे. त्याचे निरसन व्हावे.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की आसवणी प्रकल्पात प्रदुषकारी घटक म्हणुन स्पेंट वॉश निर्माण होतो. त्यावर प्रक्रिया करण्याकरीता एमईई ही सयंत्रणा असून त्यात स्पेंट वॉशचे बाष्पीकरण करून त्याची घनता कमी करण्यात येते व नंतर त्याचा वापर इंधन म्हणुन करण्यात येतो. बाष्पीभवाना दरम्यान होणा-या कन्डेनसेटवर प्रक्रिया करुन त्याचा आसवणी प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येईल. कुठल्याही प्रकारचे उदयोगिक सांडपाणी उदयोगाबाहेर जाणार नाही. त्याचप्रमाणे हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ६० मीटर उंचीची चिमणी लावण्यात येईल. त्यास अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा म्हणून ईएसपी (Electro Static Precipitator) बसविणेत येणार आहे.

त्यावेळी श्री राजेन्द्र जगताप यांनी Three R system - Reduce, Reuse and Recycle याचा अवलंब करण्याची सुचना केली. हा प्रकल्प परिसराच्या विकासासाठी गरजेचा आहे, याबाबत दुमत नाही.

४ <u>श्री विशाल रामदास गायकवाड, करंजेपूर, तालुका-बारामती, जिल्हा-पुणेः-</u>

या विस्तारिकरण प्रकल्पामुळे परिसराला, सभासदांना काय फायदा होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रकल्प विस्तारिकरणामुळे प्रकल्पात अतिरिक्त साखर, वीज व अल्कोहोलची निर्मिती होणार आहे. विस्तारिकरण प्रकल्पात ७७ लोकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार आहे. तसेच विस्तारिकरणामुळे आजूबाजूच्या गावांचाही विकास होतो.

**श्री विशाल गायकवाड** यांनी सांगितले की परिसराचा विकास होणार असेल तर त्यास आमचा पाठिंबा आहे.

५ <u>श्री हरिश्चंद्र भालचंद्र जगताप, राहणार-मुरुम, तालुका-बारामती, जिल्हा-पुणेः-</u>

श्री हरिश्चंद्र जगताप यांनी विचारले की या प्रकल्पामुळे ऊस उत्पादक शेतक-यांना काय व कशाप्रकारे फायदा होईल?

यावेळी अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार या दोघांनीही उत्तर देण्याची सूचना केली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पामुळे उत्पन्न होणारी साखर, वीज व इथेनॉल यामुळे अतिरिक्त उत्पन्न मिळेल, त्यामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला अतिरिक्त भाव देता येईल.

**प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक** यांनी उत्तर दिले की कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये गेले पाच वर्षांचा ऊस उत्पादनाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी १२ लाख मे. टनापेक्षा जास्त ऊस गाळपासाठी उपलब्ध होईल असे दिसले. २८,००० सभासदांव्दारे या कारखान्यास ऊस मिळतो. या अतिरिक्त ऊसाचे गाळप करण्याचे आवाहन संचालक मंडळावर होते. त्यासाठी विस्तारवाढीचा प्रस्ताव हाती घेण्यात आला. तसेच विस्तारीकरण प्रकल्पात वीज निर्मीती ही करण्यात येईल त्यामुळे उत्पादन खर्चात मोठी बचत होईल. त्यामुळे मिळणा-या नफ्यातून सभासदांना ऊसाला अतिरिक्त भाव देणे कारखान्याला शक्य होणार आहे.

६ श्री उत्तम म्हस्कू होळकर, गाव-होळ, तालुका-बारामती, जिल्हा-पुणेः-

सदरहू विस्तारिकरण प्रकल्पामुळे परिसरातील शेती, पीके, गुरेढोरे यांना काही त्रास होईल का?

**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की प्रकल्प विस्तारिकरण करताना संभाव्य प्रश्नांचा विचार केलेला आहे. बॉयलरमधून जी धुळ उडेल, त्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाची मार्गदर्शक तत्वे पाळण्यात येतील. त्यानुसार इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर ही हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. त्यामुळे धुळीचा परिणाम आजूबाजूच्या परिसरात होणार नाही.

७ श्री धनराज बाळासाहेब जगताप, राहणार-सोमेश्वरनगर वाणेवाडी, तालुका-बारामती,जिल्हा-पुणे,

श्री धनराज जगताप यांनी विचारणा केली की हवा प्रदुषण नियंत्रणाबाबतची माहिती व चित्रिकरण असल्यास ते दाखववेच. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू अहवाल हा ग्रामपंचायतीत उपलब्ध आहे. श्री धनराज जगताप यांनी ग्रामपंचायतींची नांवे विचारली.

आयोजक यांनी सांगितले की करंजे, करंजेपूल, वाघळवाडी. वाणेवाडी, सोरटेवाडी या ग्रामपंचायतींमध्ये जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल उपलब्ध करण्यात आलेला होता. त्याची पोचही संबंधित व्यक्तीस दाखविण्यात आली.

८ श्री वैभव अशोक गायकवाड, सरपंच, करंजेपूल ग्रामपंचायत, तालुका-बारामती, जिल्हा-पुणेः-

प्रकल्प विस्तारिकरण करत असताना पाण्याची कमतरता पडेल का, त्याचप्रमाणे विस्तारिकरण करत असताना रोजगारांची निर्मिती होईल काय?

**पर्यावरण सल्लागार** प्रकल्प विस्तारिकरण झाल्यानंतर प्रकल्पात ७७ व्यक्तींनी प्रत्यक्ष रोजगाराची संधि उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे जवळजवळ ३०-३५ व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळेल. प्रकल्प प्रवर्तकांनी पाटबंधारे खाते, पुणे येथून पाणी वापराबाबत परवानगी घेतलेली आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता भासणार नाही.

श्री वैभव गायकवाड यांनी सांगितले की करंजेपूल ग्रामपंचायतीच्या वतीने प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा देत आहे.

९ **श्री तुषार राजकुमार सुकुंडे, राहणार-वाघळवाडी, तालुका-बारामती, जिल्हा-पुणेः-**

श्री तुषार सुकुंडे यांना सांगितले की कारखान्याचे विस्तारिकरण होत आहे. ही सभासदांच्या दृष्टीने खरोखरच आनंदाची गोष्ट आहे. विस्तारिकरणामुळे परिसरात काही त्रास होणार नाही, पर्यावरणाची योग्य काळजी घेण्यात येईल असे हमीपत्र कारखान्याने ग्रामपंचायतीस दिलेले आहे. तरी ग्रामपंचायतीच्या वतीने कारखान्यास एक सूचना आहे की कारखान्याने दर्शनीभागावर एक बोर्डवर सूचना लिहिलेली आहे. त्यावर गाव म्हणून सोमेश्वरनगर असे लिहिलेले आहे. परंतु बोर्डवर नमुदे केलेले गट नंबर हे वाघळवाडी या ग्रांमपंचायतीच्या कार्यक्षेत्रात असून त्याबाबत योग्य ती दुरुस्ती करण्याची ग्रामपंचायतीतर्फे विनंती केली.

**पर्यावरण सल्लागार** सदर दुरुस्ती करण्यात येईल असे सांगितले.

१० **श्री राहूल उत्तमराव जगताप, राहणार-वाणेवाडी,तालुका-बारामती,जिल्हा-पुणेः-**

प्रकल्पातुन उत्पन्न होणा-या स्पेंट वॉशची कशाप्रकारे विल्हेवाट लावण्यात येईल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आसवणी प्रकल्पातून ७२०.० घनमीटर/दिन स्पेंट वॉश उत्पन्न होणार आहे. त्यास एमईईमध्ये प्रक्रिया करुन त्याचे प्रमाण १८०.० घनमीटर/दिन एवढे आणले जाईल. त्याचा वापर बगॅससोबत इंधनमधून करण्यात येईल.

त्यावेळी श्री राहुल जगताप यांनी ७२० घनमीटर स्पेंट वॉश १८० घनमीटर कसे आणणार याबाबत प्रश्न विचारला. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले मल्टी इफेक्टीव्ह ईव्हापरेटर या अदयावत यंत्रणेद्वारे स्पेंट वॉश घनता कमी करण्यात येईल. बाष्पीभवना दरम्यान होणा-या कन्डेनसेटवर प्रक्रिया करुन त्याचा आसवणी प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पात जे रोज ताजे पाणी लागेल, त्याचे प्रमाण लक्षणीय कमी होईल.

**पर्यावरण सल्लागार** यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की आपला प्रश्न आहे बाष्पीभवन करताना जे पाणी वरती जाईल त्याचा काही परिणाम होईल का? तर त्यास उत्तर देताना सांगण्यात आले की बाष्पीभवन प्रक्रिया ही संपूर्णपणे बंद व्यवस्था आहे. श्री जगताप यांनी प्रश्न विचारला की स्पेंट वॉश हा मानवी शरीराला घातक आहे काय? त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की येथे स्पेंट वॉश बगॅसबरोबर जाळणार असून प्रदुषण नियंत्रणाकरीता योग्य ती हवा प्रदुषण नियंत्रणा यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

**आयोजक** यांनी सांगितले की आता नवीनवीन तंत्रज्ञान येत आहे. पूर्वी आपल्याकडे स्पेंट वॉशचे खत बनविले जात असे. आता स्पेंट वॉश बॉयलरमध्ये इंधन म्हणून वापरले जाते. त्यामुळे प्रकल्पात स्पेंट वॉश पर्यावरणात येणार नाही.

श्री राहूल जगताप यांनी प्रदूषण संदर्भात प्रश्न विचारला की स्पेंट वॉश मानवी शरीराला घातक असून कारखान्यातर्फे नियमानुसार त्यांचे व्यवस्थापन करण्यात येत नाही.

श्री राहूल जगताप यांनी बगॅस स्टोअरेजच्या बाबतीत केलेल्या उपाययोजनाची माहिती विचारली असता पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अस्तित्वात असलेल्या बगॅस स्टोअरेजमध्ये काही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन बगॅस वातावरणात उडू नये म्हणून उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी शेड, बगॅस बेलिंग, बगॅस कन्व्हेअर बंद करण्यात आलेले आहे,.

श्री राहुल जगताप यांनी प्रश्न विचारला की बगॅस यार्डपासून बॉयलरपर्यंत जाणा-या कन्व्हेअरच्या लांबीबाबत विचारले असता **कारखाना व्यवस्थापकीय संचालक** यांनी सांगितले की पर्यावरण अनुमती झाल्यानंतर सहवीजनिर्मिती प्रकल्प आराखडा तयार करण्यात येईल. त्यावेळेस कन्व्हेअरच्या लांबीबाबत संपूर्ण माहिती प्रकल्प अहवालात देण्यात येईल. त्यांनी सांगितले की बगॅस कन्व्हेअर बेल्ट हा बंद/कव्हरच असतो, त्याशिवाय परवानगी मिळतच नाही. त्यावेळी श्री राहूल जगताप यांनी सांगितले की सध्याच्या प्रकल्पात कन्व्हेअर बेल्ट बंद नाही. त्यावेली कारखाना व्यवस्थापकीय संचालक यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली असून प्रस्तावित प्रकल्पात त्या त्रुटी दूर करण्यात येतील असे सांगितले. त्याचप्रमाणे ईएसपीसारखी प्रभावी हवा प्रदुषण नियंत्रण यंत्रणा प्रस्तावित असल्यामुळे बगॅसचा त्रास होणार नाही.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष यांनी सांगितले की एकूण ११ लोकांनी सूचना, आक्षेप नोंदविले. आपण उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, राज्य प्रभाव आकलन प्राधिकरणाच्या राज्य पर्यावरण मुल्यांकन समितीस सादर करण्यात येतील. सदरहू तज्ज्ञ समिती ही त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(प्रताप जगताप),**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
पुणे-१,
म.प्र.नि.मंडळ, पुणे

(हिम्मत खराडे)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा-पुणे